**प्रेसनोट** दि.२३.०८.२०१९

**<u>शिर्षक</u> :- पंचायत समिती, मिरज येथील संरक्षण अधिकारी, अभय केंद्र महिला व बाल विकास विभाग अंतर्गत मिरज विभागातील सहाय्यक संरक्षण अधिकारी श्री. प्रदिप हिराचंद काळे यांना ७००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | महात्मा गांधी चौक पोलीस स्टेशन, गुरनं २६५/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | श्री. प्रदिप हिराचंद काळे, वय २४ वर्षे, व्यवसाय - सहाय्यक संरक्षण अधिकारी, अभय केंद्र, महिला व बाल विकास विभागा अंतर्गत कार्यालय, मिरज रा. डॅम फाटा, काळेवाडी, वडुज, त. खटाव, जि. सातारा (मानधनावरील कर्मचारी) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे मुलीने तिचे कुटुंबातील लोकांचे विरुध्द कौटुंबीक हिंसाचार कायद्याअंतार्गत मा. न्यायालयात तक्रारी अर्ज केलेला असुन सदर तक्रारी अर्जावरुन मा. न्यायालयाने तक्रारदार यांचे मुलीचे कुटुंबातील ३ सदस्यांना नोटीस काढलेली आहे. सदरच्या नोटीसा बजावणेकरीता संरक्षण अधिकारी, मिरज यांचेकडे देण्यात आल्या होत्या. सदरच्या नोटीसा बजावण्याकरीता सहाय्यक संरक्षण अधिकारी श्री. प्रदिप काळे यांनी तक्रारदार यांना बोलावुन घेवुन सदरच्या नोटीसा बजावण्याकरीता ८००/- रुपये द्यावे लागतील असे सांगीतले होते, सदरबाबत तक्रारदार यांनी श्री. प्रदिप काळे यांचे विरुध्द आज दि. २३.०८.२०१९ रोजी इकडील कार्यालयाकडे तक्रारी अर्ज दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि.२३.८.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. प्रदिप हिराचंद काळे, सहाय्यक संरक्षण अधिकारी, अभय केंद्र, महिला व बाल विकास विभागा अंतर्गत, मिरज यांनी तक्रारदार यांचेकडे ७००/- रुपयांची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दि.२३.८.२०१९ रोजी मिरज एस.टी.स्टँड जवळ सापळा लावला असता त्यावेळी श्री. प्रदिप हिराचंद काळे, सहाय्यक संरक्षण अधिकारी, अभय केंद्र, महिला व बाल विकास विभागा अंतर्गत, मिरज यांनी तक्रारदार यांचेकडे ७००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचे विरुध्द महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबेंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.**

संपर्क पत्ता :- **पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६**
संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**
ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार अॅप :- **acbmaharashtra.net** टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५ व्हॉट्सअॅप क्रमांक :- ९८२३६१८००१